निलंबन कालावधीचा निर्णय घेणे बाबत ...
कै. श्री.प्रविण कारभारी गागरे, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती राहुरी.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जि.प.आदेश जा.क्र.साप्रवि-१/अस्था-३/३१३८७३६/१७२/२०२६
अहिल्यानगर दिनांक. स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. इकडील सेवा निलंबन आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/३३७/२१ दि.२२/०४/२०२१
२. इकडील दोषारोप पत्र क्र.साप्रवि/आस्था-३/६३३/२०२१ दिनांक ०६/०९/२०२१
३. गट विकास अधिकारी,पं.स.राहुरी यांचेकडील पत्र क्र.आस्था-१/१०६३/२०२१ दि ०७/०१/२०२१ अन्वये दोषारोप पत्र दिनांक १४/०९/२१ रोजी बजावलेची पोहोच व दिनांक २०/०९/२०२१ रोजीचा दोषारोपाचा खुलासा प्राप्त दि.१४/१०/२०२१
४. इकडील आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/९३०/२०२१ दिनांक ०८/११/२०२१
५. इकडील आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/९३१/२०२१ दिनांक ०८/११/२०२१
६. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा.४/खाचौ/सी.आर.१६७/२०२१ दिनांक २१ मार्च २०२२
७. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि/आस्था-३/१२२१/१२५३/२०२२ दिनांक २०/१०/२०२२
८. वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र बेलापुर ता. श्रीरामपुर यांचेकडील पत्र जा.क्र.आस्था/१५८/२०२२ दिनांक ३०/१०/२०२२ सोबत श्री. गागरे प्रविण कारभारी यांचा खुलासा
९. इकडील आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/१२२१/१५३६/२०२२ दिनांक ०९/१२/२०२२
१०. अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील जि.प.कर्मचारी अपील क्रमांक ०२/२०२३ जा.क्र.९०१९ दिनांक ३१/१०/२०२३
११. इकडील पत्र क्र.साप्रवि/आस्था-३/१२२१/२८५/२०२४ दिनांक १४/०२/२०२४
१२.वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र बेलापुर ता श्रीरामपुर यांचेकडील पत्र जा.क्र.आरोग्य आस्था/३९/२०२६ दिनांक १३/०२/२०२६
१३. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ नियम ७२ (७)

कै. श्री प्रविण कारभारी गागरे, कनिष्ठ सहाय्यक, हे पंचायत समिती राहुरी, येथे कार्यरत असताना कार्यालयीन वेळेत मद्यप्राशन करुन येवुन कार्यालयीन शिस्तीचे उल्लंघन करुन कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने त्यांना संदर्भ क्र. १ अन्वये सेवानिलंबीत करणेत आलेले होते. संदर्भ क्रमांक २ अन्वये सदर प्रकरणी ज्ञापन दोषारोपपत्र बजावणेत आले होते. संदर्भ क्र.३ नुसार कै.श्री गागरे यांनी त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप अमान्य केलेने न्याय हक्काचे दृष्टीने संदर्भ क्रमांक ४ अन्वये खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करणेत येवून कै.श्री.गागरे यांना संदर्भ क्रमांक ५ अन्वये प्राथमिक आरोग्य केंद्र बेलापुर ता. श्रीरामुपर येथे पुन:स्थापित करणेत आलेले होते.

संदर्भ क्रमांक ६ अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी), नाशिक विभाग नाशिक, यांचेकडील चौकशी पुर्ण होऊन चौकशी अहवालात कै.श्री गागरे यांचेवर ठेवणेत आलेले आरोस सिध्द होत असलेचे निष्कर्ष नोंदविणेत आले. संदर्भ क्रमांक ७ अन्वये विभागीय चौकशी अहवालाच्या अनुषंगाने अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावणेत आली. संदर्भ क्रमांक ८ अन्वये कै.श्री गागरे, यांनी वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र बेलापुर ता. श्रीरामपुर यांचेमार्फत खुलासा सादर केला. सदर खुलाश्याचे अवलोकन केले असता कै. श्री गागरे यांनी सादर

केलेला खुलासा समाधानकारक नसलेने त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (४) नुसार मुळ वेतनावर आणणे (निम्न समयश्रेणीत निम्नस्तरावर आणणे) ही शिक्षा संदर्भ क्रमांक ९ च्या आदेशान्वये अंतिम करण्यात आली.

कै.श्री गागरे यांनी संदर्भ क्रमांक ९ च्या आदेशाविरुध्द अपर आयुक्त नाशिक विभाग नाशिक येथे अपिल दाखल केले. संदर्भ क्रमांक १० नुसार कै. श्री गागरे यांचे अपिल अंशत: मान्य करणेत येऊन संदर्भ क्रमांक ९ चा आदेश रद्द करुन त्यांची पुढील एक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करण्याची शिक्षा करणेत आली.

कै. श्री प्रविण कारभारी गागरे, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती राहुरी यांचा दिनांक ०५/०५/२०२१ ते दिनांक १५/११/२०२१ अखेर १९५ दिवस निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधीन होती.

कै. श्री प्रविण कारभारी गागरे, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती राहुरी, हे दिनांक २८/०५/२०२५ रोजी मयत झालेले आहे. तरी कै. श्री प्रविण कारभारी गागरे, यांचा निलंबन कालावधीचा निर्णय घेणे आवश्यक आहे. तरी सदर प्रकरणी कै. श्री प्रविण कारभारी गागरे, यांना त्यांची पुढील एक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करण्याची शिक्षा करणेत आलेली असलेने त्यांचे निलंबन समर्थनीय ठरत आहे. सबब, मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ७२ पोटनियम ७ च्या तरतुदीस अधिन राहुन कै. श्री प्रविण कारभारी गागरे, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती राहुरी यांचा दिनांक ०५/०५/२०२१ ते दिनांक १५/११/२०२१ अखेर १९५ दिवस कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत न केलेला कालावधी धरण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद कै. श्री प्रविण कारभारी गागरे, कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र बेलापुर ता श्रीरामपुर यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक .........20260331040059............... असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 31-03-2026 19:38:03

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र बेलापुर ता श्रीरामपुर

२/- सदरचा आदेश कै. श्री प्रविण कारभारी गागरे, कनिष्ठ सहाय्यक यांचे वारसदार यांना बजावणेत येऊन त्यांची दिनांकीत पोहोच या कार्यालयास सादर करावी. तसेच त्यांचे कुटुंब निवृत्ती वेतनाबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

स्वाक्षरी/--
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर